NR 144


**पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,**
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे ४११ ००८
दूरध्वनी क्रमांक ०२०- २५६५७८७८ फॅक्स क्र. ०२०-२५६७४६४१
ई मेल sp.pune.r @mahapolice.gov.in
**(आस्थापना शाखा )**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

जा.क्रं.आशा-१/वि./प्र.ब./पोलीस अंमलदार/पोशि-सपोफौ/20524 /२०२१ पुणे, दिनांक 7 /१२/२०२१.

**वाचा :-** १) महाराष्ट्र पोलीस कायदा-१९५१.
२) जिल्हा पोलीस आस्थापना मंडळ यांचे दि. ०२/१२/२०२१ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त

**विषय :- पोलीस अंमलदार यांच्या विनंती बदल्या सन २०२१...**

*********

**आदेश :-**

महाराष्ट्र पोलीस कायदा कलम २२ न् अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून जिल्हा स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांना अपवादात्मक प्रकरणांमध्ये जनहितार्थ आणि प्रशासनिक निकडीनुसार सक्षम प्राधिकारी म्हणून प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, पोलीस आस्थापना मंडळाने खालील नमूद पोलीस अंमलदारांच्या त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे <u>विनंतीनुसार स्वखर्चाने</u> बदली करण्याचा निर्णय घेतला आहे.

| अ. क्र. | हुद्दा / ब.नं. | पोलीस अंमलदारांचे नाव | सध्याचे नेमणूकीचे ठिकाण | नवीन नेमणूकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | पोहवा/२३५ | श्रावण प्रभू गुपचे आंजिब | पोलीस मुख्यालय | बारामती शहर पो. स्टे. |
| २ | पोना/१९२४ | कैलास बाळशीराम काळे | भोर पोस्टे | जुन्नर पो. स्टे. |
| ३ | पोना/२४३७ | श्रीकात अशोक वढणे | राजगड पोस्टे | १२/११/२०२० पासून SDPO कार्यालय भोर |
| ४ | पोना/१०९७ | दिलीप शंकर मोरे | मंचर पोस्टे | शिक्रापूर पो. स्टे. |
| ५ | पोना/२०४९ | ओंकार कैलास सिताप | वडगांव निंबाळकर | बारामती तालुका पो.स्टे. |
| ६ | पोना/२४७७ | आदिनाथ काळुराम लोखंडे | मंचर पोस्टे | नारायणगांव पो.स्टे. |
| ७ | पोशि/२३५३ | सुनिल ज्ञानेश्वर बांडे आंजिब | पोलीस मुख्यालय | खेड पो.स्टे. |
| ८ | पोशि/१८५० | विनोद रामनाथ काळे | पोलीस मुख्यालय | शिरुर पो.स्टे. (जनरल कर्तव्य) |
| ९ | पोशि/३९७ | श्रीधर जयसिंग जायभाय आंजिब | पोलीस मुख्यालय | शिरुर पो.स्टे. |
| १० | मपोशि/४६० | शितल बाबुराव थिटे | पोलीस मुख्यालय | जुन्नर पो. स्टे. |
| ११ | मपोशि/२९९५ | प्रियांका राजेंद्र तुपे | पोलीस मुख्यालय | अर्ज शाखा |
| १२ | मपोशि/९६ | वैशाली गंगाराम भालेराव | शिरुर पोस्टे | मंचर पो.स्टे. |
| १३ | पोशि/८४७ | सचिन नागनाथ निंबाळकर | पोलीस मुख्यालय | कामशेत पो.स्टे. |
| १४ | मपोशि/२७३९ | रत्नमाला मोहनराव पोतदार | जुन्नर पोस्टे | अर्ज शाखा |
| १५ | पोशि/२९९२ | अजित रघुनाथ पवार | पोलीस मुख्यालय | मंचर पो.स्टे. |
| १६ | पोशि/३००५ | सोमनाथ वनाजी होले | पोलीस मुख्यालय | घोडेगांव पो.स्टे. |
| १७ | पोशि/३०१५ | निलेश सुरेश तळपे | पोलीस मुख्यालय | घोडेगांव पो.स्टे. |
| १८ | पोशि/८६७ | लक्ष्मण निळकंठ सुर्यवंशी | इंदापूर पोस्टे | कामशेत पो.स्टे. |
| १९ | पोहवा/१३९८ | अनिल दामोदर तांबे | SDPO बारामती कार्यालय | पोलीस अधीक्षक, वाचक शाखा |

तरी, सर्व संबंधित पोलीस ठाणे / शाखा प्रभारी अधिकारी यांनी वर नमूद पोलीस अंमलदारांना त्यांच्या नवीन नियुक्तीच्या ठिकाणी जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाचे निर्णयानुसार तात्काळ कार्यमुक्त करुन पूर्तता अहवाल या कार्यालयास दिनांक १३/१२/२०२१ रोजी १२.०० वा. पर्यंत बिनचूक सादर करावा.

प्रभारी अधिकारी
आवक क्र. 1155
तारीख 9/12/2021

GT-2021.docx

PC/मोहोळ

सदर पोलीस अंमलदार हे बदलीचे ठिकाणी तात्काळ हजर होतील. तसेच वरील नमूद पोलीस अंमलदार यांचे यापूर्वी अथवा सद्यस्थितीला गंभीर स्वरूपाची शिक्षा / गुन्हा अथवा प्राथमिक चौकशी / विभागीय चौकशी सुरु असेल, अथवा न्यायप्रविष्ठ प्रकरण कार्यवाहीत असेल अशा पोलीस अंमलदार यांना पोलीस ठाणे येथील महत्वाचे / गोपनीय (आर्थिक व्यवहाराबाबतचे) कार्यभार सोपविण्यांत येवू नये, याची दक्षता संबंधित प्रभारी अधिकारी यांनी घ्यावी.

बदली करण्यात आलेल्या पोलीस अंमलदार यांनी पुन्हा इतरत्र बदलीबाबत विनंती अर्ज सादर करु नयेत. तसेच त्यांना आज्ञांकीत कक्ष देण्यात येणार नाही, याची समज प्रभारी अधिकारी यांनी त्यांना द्यावी.

पोलीस ठाणे / शाखा प्रभारी अधिकारी यांनी वर नमूद पोलीस अंमलदार यांना बदलीचे ठिकाणी कार्यमुक्त करतेवेळी त्यांचे ताब्यात शासकीय निवासस्थान असल्यास ते विहीत कालावधीत रिक्त करण्या बाबतची लेखी समज देण्यात यावी. त्याच प्रमाणे त्यांचे ताब्यात पोलीस मुख्यालयाकडील शासकीय मुद्देमाल साहित्य इ. असल्यास ते जमा करुन घेण्याची कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे बदली झालेले पोलीस अंमलदार हे बदलीच्या ठिकाणी तात्काळ हजर न झाल्यास, रुग्णता रजेवर गेल्यास व परस्पर गैरहजर राहिल्यास त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही केली जाईल, याची लेखी समज संबंधित पोलीस अंमलदार यांना देण्यात यावी. राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय यांनी मुख्यालयातून बदलून गेलेल्या पोलीस अंमलदार यांचा तसेच संबंधित प्रभारी अधिकारी यांनी त्यांचे पोलीस अंमलदार यांचा अहवाल मुदतीत सादर करावा.

**बदली झालेल्या पोलीस अंमलदारांचे माहे, जानेवारी, २०२२ चे मासिक वेतन हे बदली झालेल्या नवीन पोलीस ठाणेस / शाखेस काढले जाईल, याची सर्व संबंधित प्रभारी अधिकारी यांनी नोंद घ्यावी.**

बदली झालेला पोलीस अंमलदार गोपनीय / क्राईम कारकून आहे या सबबीखाली त्याला आप अधिकारात पो.स्टे / शाखेत ठेऊन घेण्यात येऊ नये, तसे निदर्शनास आल्यास संबंधित प्रभारी अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही केली जाईल, याची सर्व प्रभारी अधिकारी यांनी नोंद घ्यावी. तसेच त्यांचेकडील बदली झालेल्या पोलीस अंमलदार यांची बदली रद्द होणेबाबत अथवा त्यास मुदतवाढ मिळणेबाबत या कार्यालयास प्रभारी अधिकाऱ्यांनी विनंती करु नये.

या आदेशात नमूद पोलीस अंमलदार यांची विनंतीप्रमाणे बदली झालेली असलेने त्यांना पदग्रहण अवधी व बदली प्रवास भत्ता अनुज्ञेय असणार नाही, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

तसेच बदली झालेले पोलीस अंमलदार बदलीचे ठिकाणी हजर न झाल्यास त्यांची नांवे या कार्यालयास कळवावीत. **याव्यतिरिक्त या घटकास प्राप्त इतर पोलीस अंमलदारांचे विनंती अर्ज दप्तरी दाखल करण्यात आलेले आहेत. सदर बाबत कोणीही अंमलदार त्यांचे विनंती अर्जाचे अनुषंगाने कार्यालयात आज्ञांकित कक्षासाठी उपस्थित राहणार नाही, याची समज त्यांना प्रभारी अधिकारी यांनी द्यावी.**

कोणताही पोलीस अंमलदार बदलीवर कार्यमुक्त करण्यास राहीलेला नसलेबाबतचा अहवाल दिनांक १३/१२/२०२१ रोजी १२:०० वाजेपावेतो बिनतारी संदेश / खास दुतामार्फत /ई-मेलद्वारे establishmentpuner@gmail.com वर कळविण्याची वैयक्तिक जबाबदारी ही पोलीस ठाणे / शाखा प्रभारी अधिकारी यांची राहील, याची नोंद घ्यावी.

**(जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाचे मान्यतेने)**

**(डॉ. अभिनव देशमुख)** भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण तथा
अध्यक्ष, जिल्हा पोलीस आस्थापना मंडळ, पुणे ग्रामीण.

प्रति,

**सर्व पोस्टे / शाखा** प्रभारी अधिकारी, पुणे ग्रामीण.
**सर्व उप विभागीय** पोलीस अधिकारी, पुणे ग्रामीण.
**प्रभारी अधिकारी**, नियंत्रण कक्ष, पुणे ग्रामीण. (ई मेलद्वारे प्रसिध्दीस्तव)
**राखीव पोलीस** निरीक्षक, मुख्यालय, पुणे ग्रामीण.
**पोलीस निरीक्षक**, मोपवि, पुणे ग्रामीण.

**GT-2021.docx**

प्रत,

प्रमुख लिपीक, लेखा शाखा (२ प्रतीत) / पत्रव्यवहार शाखा, पुणे ग्रामीण.
जिल्हा पोलीस प्रसिध्दी पत्रक / आस्थापना लिपीक -३, ४, ५, ६, ७, ८, ९ व १०.

प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव,

प्रमुख लिपीक, लेखा शाखा (०२) प्रतीत/ पत्रव्यवहार शाखा / जिल्हा पोलीस प्रसिध्दी पत्रक.
प्रभारी अधिकारी, नियंत्रण कक्ष, पुणे ग्रामीण.
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण.

२/- संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.

प्रत,

अपर पोलीस अधीक्षक, बारामती विभाग / पुणे विभाग, पुणे ग्रामीण.

प्रत- पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय, पुणे ग्रामीण.

प्रत सादर,

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर.

K.M.Raut
WPC/1268

GT-2021.docx